३ ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६७ वा • गुरूवार, ता. ११ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## विश्वरत्न बाबासाहेबांच्या हयातीत बसवलेल्या पुतळ्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा

### कोल्हापूरातील ७५ वर्षांचा इतिहास जागृत



**कोल्हापूर । रयत समाचार**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आज भारतासह जगभरात उभारले गेले असले, तरी बाबासाहेबांचा त्यांच्या हयातीतच बसवला गेलेला एकमेव ऐतिहासिक पुतळा कोल्हापूरात असल्याची माहिती इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी दिली.

बाबासाहेबांच्या कार्याची साक्ष देणारा हा पुतळा ता.९ डिसेंबर १९५० रोजी तत्कालीन रविवार वेस (सध्याचा बिंदू चौक) येथे समाजसुधारक सत्यशोधक भाई माधवराव बागल यांच्या पुढाकाराने बसवण्यात आला होता. आज या ऐतिहासिक पुतळ्याला नेमकी ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

या निमित्ताने कोल्हापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती समितीच्या वतीने अमृत महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या उपस्थितीत पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

> बिंदू चौकातील हा पुतळा हा फक्त स्मारक नसून डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाच्या विचारांचे जिवंत प्रतीक असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन तानाजी नलवडे, प्रमुख अतिथी जयसिंगराव पवार, मुख्य मार्गदर्शक म्हणून इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत, तर अध्यक्षस्थानी अॅड. प्रेमानंद मोरे उपस्थित होते.

कार्यक्रमात बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा, पुतळ्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि कोल्हापूरच्या सामाजिक चळवळीतील त्याचे स्थान याबाबत मनोगत व्यक्त करण्यात आले. नागरिकांची मोठी उपस्थिती, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे अमृत महोत्सवी सोहळा ऐतिहासिक ठरला.

## सरकारी योजनांच्या नावाखाली देणग्या ? भाजपचा वादग्रस्त निधी संकलन प्रकार

**नवी दिल्ली । रयत समाचार**

केंद्राच्या कल्याणकारी योजनांच्या नावाखाली भारतीय जनता पक्षाने काही वर्षांपूर्वी लोकांकडून देणग्या गोळा केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे, स्वच्छ भारत, बेटी बचाओ बेटी पढाओ आणि किसान सेवा या सरकारी योजनांसाठी देणग्या स्वीकारण्याचा पर्याय आजही NaMo अॅप आणि narendramodi.in या पोर्टलवर उपलब्ध असल्याचे दिसून येते.

चेन्नईतील ज्येष्ठ पत्रकार व सथियाम टीव्हीचे न्यूज एडिटर बी. आर. अरविंदाक्षन यांनी दाखल केलेल्या आरटीआय अर्जांना मिळालेल्या उत्तरांतून महत्त्वाची माहिती समोर आली आहे. केंद्रातील कोणत्याही मंत्रालयाने किंवा पंतप्रधान कार्यालयाने (PMO) भाजपला सरकारी योजनांसाठी निधी संकलनाची विशेष अथवा अधिकृत परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२१ ते फेब्रुवारी २०२२ या काळात भाजपने narendramodi.in आणि NaMo अॅप या खासगी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून निधी संकलन मोहीम राबवली. देणगी देताना नागरिकांना वरील तीन सरकारी योजनांपैकी एक निवडण्याचा पर्याय देत, अंतिम ‘ ’ मात्र असा दर्शवला जात होता. म्हणजेच, सरकारी योजनेच्या नावाखाली प्रत्यक्षात देणगी पक्ष निधीकडे वळवली जात असल्याचे स्पष्ट होते

दरम्यान, संबंधित मंत्रालयांनी आरटीआय उत्तरांत सांगितले की या योजनांसाठी निधी संकलन करण्यास कोणत्याही प्लॅटफॉर्मला NaMo अॅप असो वा इतर प्रोत्साहन, मान्यता किंवा औपचारिक परवानगी दिली नव्हती. त्यामुळे हा संपूर्ण प्रकार गंभीर प्रश्न निर्माण करणारा ठरत आहे.

सद्यस्थितीत या आरोपांवर भाजपकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, आरटीआयमधून समोर आलेल्या तथ्यांमुळे राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये या निधी संकलन मोहिमेबाबत शंका निर्माण झाल्या आहेत.

## प्रसाद आवारी यांची नाविवा मंत्रालयात ऑपरेशन अधिकारी म्हणून निवड




**पारनेर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील रांधे येथील प्रसाद शोभा भाऊसाहेब आवारी यांची युपीएससीमार्फत केंद्र सरकारच्या नागरी विमान वाहतूक मंत्रालयात ऑपरेशन अधिकारी पदासाठी निवड झाली. ०६.२०२५ जाहिराती अंतर्गत घेतलेल्या भरती प्रक्रियेत त्यांनी ओबीसी प्रवर्गातून उत्तीर्ण होत अंतिम यादीत स्थान मिळवले आहे.

प्रसाद आवारी हे अहिल्यानगरचे सैनिक कल्याण संघटक चंद्रकांत शिंदे यांचे भाचे आहेत. साध्या कुटुंबातील असूनही त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर युपीएससीच्या मुलाखतीत यश मिळवले. १० ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या मुलाखतीनंतर युपीएससीने जाहीर केलेल्या अंतिम निकालात त्यांचा क्रमांक २० असा आहे. त्यांच्या निवडीमुळे रांधे गाव, पानोली परिसर, पारनेर तालुका आणि जिल्ह्यातून आनंद व्यक्त केला जात आहे. कुटुंबीयांनी, नातेवाईकांनी आणि स्थानिक नागरिकांनी प्रसाद यांचे अभिनंदन केले आहे.

## वाहतूक दंड माफीचा दावा खोटा

**मुंबई । रयत समाचार**

१३ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीत महाराष्ट्रात वाहतूक दंडावर १०० टक्के सवलत देण्यात येणार असल्याचा सोशल मीडियावर व्हायरल होणारा दावा खोटा असल्याचे महाराष्ट्र पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या सूचनेनुसार, राज्यातील लोकअदालतीत ई-चलान प्रकरणांची तडजोड स्वीकारली जाणार नाही. त्यामुळे दंड माफी किंवा सवलतीबाबतचे सर्व संदेश अफवा असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## महामंडळे, शासकीय समिती नियुक्त्यांना मुहूर्त नाहीच

### कार्यकर्ते अस्वस्थ; सत्ता असूनही काहीच मिळेना

**मुंबई । शफीक बागवान**



महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर दोन वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी विविध महामंडळे, शासकीय समित्या आणि विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदांच्या नियुक्त्या अद्यापही झालेल्या नाहीत. त्यामुळे पक्षासाठी वर्षानुवर्षे झटणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली असून, ‘‘न्याय कुणाकडे मागावा?’’ अशी भावना अनेकांमध्ये निर्माण झाली आहे.

कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, महामंडळे व समित्यांवरील नियुक्त्या ही कार्यकर्त्यांना मिळणारी राजकीय दाद असते, परंतु महायुती सरकारकडून

> महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातलेल्या असल्याने या नियुक्त्या आणखी किमान वर्षभर लांबणीवर पडू शकतात, असे संकेत मिळत आहेत.

याबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने त्यांच्या नाराजीला उधाण आले आहे. ‘‘कार्यकर्ते उपाशी आणि नेते तुपाशी’’ अशी स्थिती असल्याची टीका देखील कार्यकर्त्यांतून होत आहे.

सध्या राज्यात भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस असा तीन पक्षांचा महायुती सरकार आहे. या तिन्ही पक्षांमध्ये महामंडळांच्या वाटपावरील फॉर्म्युला ठरलेला नसल्याने नियुक्त्या रखडल्या आहेत.

याशिवाय एका मागोमाग चालू असलेल्या तू-तू, मैं-मैंमुळे प्रशासनापासून ते राजकीय पातळीपर्यंत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंत्रिमंडळातील फेरबदल आणि विस्ताराबाबतची जुनी चर्चा पुन्हा रंगू लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘‘निष्क्रिय मंत्र्यांना डच्चू देऊ’’ असे दिलेले वक्तव्यही चर्चेला पूरक ठरले आहे.

मागील महाविकास आघाडी सरकारच्या काळातही अनेक नेमणुका रखडल्या होत्या. महायुती सरकारकडून मात्र त्या त्वरित होतील, अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा होती; पण तीही फोल ठरल्याने तीनही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये निराशा वाढली आहे.

महत्वाच्या महामंडळांसाठी अनेक दावेदार असून, या नियुक्त्या जाहीर झाल्यास अनेक स्थानिक पातळीवरील निर्णयांना चालना मिळाली असती. पण मंत्रिमंडळ विस्ताराच्या वादामुळे त्याचे पडसाद महामंडळ नियुक्त्यांवर उमटत आहेत.

यामुळे शिंदे शिवसेना आणि अजित पवार गटातील कार्यकर्त्यांची संपूर्ण निराशा झाली आहे. महामंडळांसह इतर समित्यांवरील नियुक्त्या कधी होणार याबाबत सरकारतर्फे कोणतीही अधिकृत भूमिका न जाहीर झाल्यामुळे कार्यकर्त्यांचे मनोबल खालावत चालले आहे.




## आरजीला संपविण्यासाठीचा होता मास्टरप्लान- मनोज परब

### युती तुटण्यास पाटकर, सरदेसाई कारणीभूत

पणजी । रयत समाचार

आम्ही गोव्याच्या जनतेच्या हितासाठी आमचे सर्व हेवे दावे मागे सारून युतीसाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले, परंतु युतीधर्मच पाळला गेला नाही. आमची होऊ घातलेली युती ही गोवा फॉरवर्डचे प्रमुख विजय सरदेसाई आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांच्यामुळे तुटल्याचा आरोप आरजीपीचे प्रमुख मनोज परब यांनी केला.

पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत परब बोलत होते. यावेळी आमदार वीरेश बोरकर आणि अजय खोलकर उपस्थित होते. परब म्हणाले, आम्हाला युतीनाट्यात खेळवत ठेवून आरजी पक्ष संपविण्याचा मास्टरप्लान सरदेसाई व पाटकर यांचा होता.

मी आणि वीरेश बोरकर पूर्वी मुंबईला विमानाने गेलेला फोटो समाजमाध्यमांवर टाकत दिल्लीला गेल्याचे विजय सरदेसाईंना वाटावे यासाठी टाकला. त्यामागे आमचा काही सुप्त उद्देश होता. आम्हाला युतीच्या बोलणीवेळी सरदेसाईंबाबत संशय निर्माण झाला होता, म्हणून हा फोटो युरी आलेमाव यांना कल्पना देऊन टाकण्यात आला होता, असे मनोज परब यांनी सांगितले.

## ‘चिल्लर घोटाळा’ प्रकरणात ‘एकट्या चेअरमन’वर आरोपांचा प्रश्न अनुत्तरित

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही चौकशीच्या कक्षेत आणण्याची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

२९१ कोटी रूपयांपेक्षा मोठा असलेल्या तसेच राज्यभर गाजलेल्या चिल्लर घोटाळा प्रकरणाच्या ता.१० डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत अनेक गंभीर मुद्द्यांवर चर्चा झाली. नगर अर्बन बँकेच्या कर्ज प्रकरणात मृत चेअरमन दिलीप गांधी यांच्यावरच एकट्याला आरोपी ठरविण्यात आले, मात्र कर्ज मंजुरी ही संचालक मंडळ, कर्ज उपसमिती आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय शक्य नसल्याने फक्त चेअरमनला आरोपी दाखविणे ही गंभीर त्रुटी असल्याचा मुद्दा माजी संचालक तथा बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी यांनी मांडला. कर्ज मंजूर होण्यापूर्वीच कर्जदाराला रक्कम देण्यात आल्याचे दस्तऐवज दाखविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली. हे सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचा संशय व्यक्त होऊन, वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही आरोपी करण्यात यावे, अशी मागणी गांधी यांनी केली.

**गुन्हा ३ वर्ष ‘दडपला’; आंदोलनानंतर एफआयआर**

अधिक माहिती देताना राजेंद्र गांधी म्हणाले, २०१७ मध्ये झालेल्या अनियमिततांबाबतची पोलीस तक्रार २०२० पर्यंत दाखलच झाली नाही. बँकेवर प्रशासक आल्यानंतरही गुन्हा लपवून ठेवण्यात आला. बँक बचाव समितीने आंदोलन केल्यानंतरच संबंधित एफआयआर दाखल झाल्याचा आरोप समितीकडून करण्यात आला आहे.

गांधी यांच्या मते, या आंदोलनाचा राग धरून तत्कालीन सीईओ सतीश शिंगटे यांनी समिती सदस्यांवर आयपीसी ३५३ अंतर्गत खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला होता.

**चार्जशीटमधून अनेक मुद्दे गायब : समितीची नाराजी**

केसचा पाठपुरावा करणारे राजेंद्र गांधी यांना साक्षीदार म्हणून दाखल केले असले तरी त्यांचा जबाब अद्याप झाला नाही. चार्जशीटमध्ये अनेक महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट नसल्याची नाराजी व्यक्त झाली असून, पूरवणी चार्जशीट दाखल करून आरोपी वाढवावेत, अशी मागणी बँक बचाव समितीकडून राजेंद्र गांधी यांनी केली.

**कोर्टातील कामकाज**

आरोपी आशुतोष लांडगे तर्फे राजेंद्र गांधी केसमध्ये तृतीय-पक्ष (तिऱ्हाईत इसम) म्हणून सहभागी होण्यास हरकत घेतली गेली. यावर पुढील सुनावणी ता.५ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

## महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचा उत्साही शुभारंभ




**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

‘पुस्तकी शिक्षणाबरोबरच रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयांनी संशोधन क्षेत्रातही आघाडी घेतली पाहिजे,’ अशी उत्साही अपेक्षा व्यक्त करत हडपसर येथील एस. एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी महात्मा फुले महाविद्यालय, संभाजीनगर, चिंचवड येथे आयोजित सात दिवसीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद व चर्चासत्राचे उद्घाटन केले. बुधवार,१० डिसेंबर रोजी झालेल्या उद्घाटन सोहळ्यात ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. सतिश गोरडे, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. मच्छिंद्र गोफणे, सी-मेट संस्थेचे प्रा. डॉ. रामचंद्र कलबर्मे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले, प्रा. संजय अहिवळे आणि प्रा. शहाजी मोरे उपस्थित होते.

## रेशन तांदळाचा भ्रष्टाचार,५७० जणांना अटक, ३१४ वाहने जप्त

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



अन्नभाग्य योजनेतील तांदळाची बेकायदेशीर साठवणूक आणि विक्री प्रकरणी राज्यभरात ५७० जणांना अटक करण्यात आली आहे. संबंधितांकडून २९,६०३.१५ क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला असून ३१४ वाहने जप्त करण्यात आली आहेत. रेशन तांदळाचा बेकायदेशीर साठा व विक्री रोखण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी देखरेखीचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची आवश्यकता नसून अधिकारी आपले कर्तव्य बजावत आहेत. जानेवारी महिन्यापासून राज्यातील बीपीएल कार्डधारकांना इंदिरा किटचे वितरण सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री के. एच. मुनियप्पा यांनी दिली.

विधानपरिषदेत भाजपचे सदस्य सी.टी. रवी यांच्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले. अन्न आणि नागरी पुरवठा खात्याचे अधिकारी व कर्मचारी बेकायदेशीर रेशन तांदळाची विक्री रोखण्यासाठी आपले कार्य चोखपणे बजावत आहेत. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्यांवर कारवाई सुरुच असून राज्य सरकार तांदळाची बेकायदा विक्री रोखण्यासाठी सर्वतोपरी पावले उचलत आहे. यामुळे या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची आवश्यकता नसून सरकार गोरगरिबांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

मंत्री मुनियप्पा यांनी समर्पक उत्तर न दिल्याने विरोधी पक्षाच्या आमदारांनी त्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र पंचायतराज मंत्री प्रियांक खर्गे मुनियप्पा यांच्या मदतीला धावून आले. खर्गे यांनी तसेच जमखंडी येथील पत्रकाराच्या हत्या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येत असून या प्रकरणी अनेक संशयितांना अटक केल्याचे त्यांनी सांगितले. भाजपचे पदाधिकारीच रेशन तांदळाच्या काळाबाजारात सामील असल्याचा आरोप केला. यामुळे सभागृहात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या. यावेळी विरोधी पक्षनेते चलवादी नारायणस्वामी आक्रमक झाले. त्यांनी, आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा राज्य सरकारने रेशन तांदळाचा काळाबाजार थांबविण्यासाठी प्रयत्न करावेत, असा सल्ला दिला. मंत्री मुनियप्पा म्हणाले, यादगिरी जिल्ह्यातील अन्न व नागरी पुरवठा खात्यातील अधिकारी तांदळाच्या बेकायदेशीर विक्री प्रकरणात आढळून आले होते. यामुळे त्यांचे तत्काळ निलंबन काले. रेशन तांदळाचा साठा व विक्री प्रकरणात सहभाग असलेल्यांवर जीवनावश्यक वस्तू कायदा-१९५५ अंतर्गत फौजदारी खटला चालविण्यात येणार आहे.

# अनिरुद्ध धर्माधिकारी यांचा 'पंडित बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर' पुरस्काराने गौरव

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील कल्पवृक्ष श्री स्वामी समर्थ मठातर्फे दत्त जयंती उत्सव मोठ्या भाविक उपस्थितीत साजरा करण्यात आला. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पुरस्कार वितरण सोहळा आणि गायन मैफलीत नगर शहराचे नामवंत शास्त्रीय गायक अनिरुद्ध धर्माधिकारी यांना 'पंडित बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

आप्पासाहेब सातभाई व प्रमिलाताई सातभाई यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारा हा मानाचा पुरस्कार सन्मानपत्र, महावस्त्र आणि रोख रक्कम देऊन प्रदान करण्यात आला. हा सन्मान मठाच्या प्रमुख सुनंदा देशपांडे, राहुल देशपांडे व सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभाताई धूत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



कार्यक्रमाची शान ठरलेल्या गायन मैफलीत अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी राग 'शाम कल्याण'चा विस्तार, तसेच रागमाला, नाट्यपद व संतरचना प्रभावीपणे सादर करून रसिकांची मने जिंकली. मैफलीची सांगता संस्था विश्वस्त पवन नाईक यांच्या भावपूर्ण भैरवीने झाली. गुणी कलाकार हर्षद भावे (तबला), कल्याण मुरकुटे (संवादिनी) आणि मूलाशु परदेशी (टाळ) यांच्या समर्थ साथसंगतीने कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सुनील कात्रे यांनी केले. त्यांनी कल्पवृक्ष मठाच्या उपक्रमांची माहिती देत पुरस्काराच्या परंपरेविषयी सांगितले. किराणा घराण्याचे मान्यवर गायक आप्पासाहेब सातभाई यांच्या स्मृती जतन करण्यासाठी हा पुरस्कार अनेक वर्षांपासून दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रतिभाताई धूत म्हणाल्या, सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी असे कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचे असून यामुळे नव्या शास्त्रीय गायकांची पिढी निर्माण होते.

आतापर्यंत कुमारी अंजलीनंदिनी गायकवाड, पवन नाईक, कल्याण मुरकुटे, हर्षद भावे, अदिती दराडे, सानिका गोरेगावकर या कलाकारांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रेयस शित्रे, संगीत ठाकुर, रवी जाधव, सागर चव्हाण तसेच मठातील सेवकांनी विशेष प्रयत्न केले. मीनल काळे, अशोक गांधी, विजय शिंदे यांच्यासह अनेक संगीतप्रेमी उपस्थित होते.

# आकाशवाणी निवेदकांनी केला सुदाम बट्टुळे यांचा सन्मान

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील आकाशवाणी केंद्राचे प्रसारण अधिकारी सुदाम बट्टुळे यांची पदोन्नती होऊन कार्यक्रम अधिकारीपदावर नियुक्ती झाली. त्यांच्या यशाबद्दल आकाशवाणी अहिल्यानगर केंद्राचे हंगामी निवेदक किरण डहाळे, अतुल सातपुते व आदिनाथ अन्नदाते यांच्यावतीने सुदाम बट्टुळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन आकाशवाणी कार्यालयात सत्कार करण्यात आला.

बट्टुळे आपल्या कार्यक्रम अधिकारीपदाच्या कार्यकाळात श्रोत्यांसाठी नवनवीन कार्यक्रमांची निर्मिती करून श्रोत्यांसाठी नक्कीच दर्जेदार कार्यक्रम देतील, अशी अपेक्षा निवेदक किरण डहाळे यांनी यावेळी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना बट्टुळे यांनी आगामी काळात श्रोत्यांसाठी काही नवीन कार्यक्रम करण्याचा मानस असल्याचे सांगितले. तसेच



कार्यक्रम अधिकारी म्हणून काम करतांना आपल्या सर्वांचे असेच सहकार्य आवश्यक आणि अपेक्षित आहे. जेणेकरून आकाशवाणी अहिल्यानगर केंद्राच्या माध्यमातून आपल्या जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील सर्व श्रोत्यांना चांगल्या गोष्टी आपण देऊ शकू आणि खऱ्या अर्थानं बहुजन हिताय बहुजन सुखाय हे आकाशवाणीच ब्रीदवाक्य आपल्याला सार्थक ठरवता येईल, असेही बट्टुळे यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी हंगामी कार्यालयीन सहाय्यक वृषाली घनवट उपस्थित होत्या.

# राष्ट्राच्या आर्थिक आराखड्यात चार्टर्ड अकाउंटंटचे योगदान महत्त्वाचे– नादीर शेख

## इनामदार इंग्लिश स्कूलकडून सीए उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव

**अहमदनगर । आबीद खान**

चार्टर्ड अकाउंटंट ही केवळ एक पदवी नसून कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाने जिंकलेले शिखर आहे. देशातील सर्वांत कठीण परीक्षांपैकी मानल्या जाणाऱ्या सीए परीक्षेत उत्तीर्ण होणे ही विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता, गणिती दृष्टी, संयम आणि निर्णयक्षमता यांची कसोटी असते. हे सर्व टप्पे पार करून विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश अत्यंत कौतुकास्पद असल्याचे मत चार्टर्ड अकाउंटंट नादीर शेख यांनी व्यक्त केले.



इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या पी. ए. इनामदार इंग्लिश स्कूलतर्फे शेख मोहम्मद रजा सलीम व सय्यद मोहम्मद मोहासीब साजिद यांनी सीए परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीए नादीर शेख दाऊद, तर पी. ए. इनामदार इंग्लिश स्कूलचे प्राचार्य युनूस सलीम, उपप्राचार्या फरहाना शेख, संस्थेचे अध्यक्ष अब्दुल रहीम खोकर, उपाध्यक्ष इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, तसेच शब्बीर मोहम्मद, सरोज, राजश्री भिंगारदिवे आदी उपस्थित होते. शेख यांनी सांगितले की, अनेक वर्षांच्या मेहनतीची, जागल्या रात्रींची आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्याची ही पावती आहे. उत्तीर्ण विद्यार्थी आता देशाच्या आर्थिक व्यवस्थेला पारदर्शक, सक्षम आणि प्रगत बनविण्याची जबाबदारी सांभाळतील. उद्योग–व्यवसायांच्या विकासात, कर व्यवस्थेच्या शिस्तीत आणि आर्थिक आराखड्यात चार्टर्ड अकाउंटंटचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कार्यक्रमात सर्व संचालक मंडळ, एस. इंडिया फाउंडेशनचे सदस्य आणि शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# 'स्वच्छ, सुंदर, हरित' अभियानाचा शुभारंभ

## नागरिकांच्या सहभागातून प्रभाग आदर्श बनविण्याचा निर्धार

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील प्रत्येक प्रभाग हेच आपले घर मानून परिसर स्वच्छ, सुशोभित आणि हरित ठेवण्यासाठी जनजागृती निर्माण करत लोकचळवळ उभी करण्याचा उपक्रम प्रभाग क्रमांक १ मध्ये उत्साहात सुरू झाला. प्रभागातील स्वच्छतेसोबत झाडांच्या खोडांना आकर्षक रंगकाम करून परिसर प्रसन्न व सुंदर बनविण्याचे काम सुरू आहे.

'स्वच्छ सुंदर हरित अहिल्यानगर' निर्माण करण्यासाठी हे अभियान सुरू असून, प्रभाग क्रमांक १ विकासकामांतूनही 'एक नंबर' ठरविण्याचे ध्येय असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष



संपत बारस्कर यांनी सांगितले.

बारस्कर म्हणाले की, "प्रभागातील प्रत्येक रस्ता, चौक आणि वस्ती स्वच्छ, नीटनेटकी व हिरवीगार राहावी यासाठी खाजगी स्वच्छता कर्मचारी, दोन ट्रॅक्टर, झाडांना रंगकामासाठी पेंटर, तसेच गवतझाडेमातीदगड यांच्या डीप क्लिनिंगसाठी आवश्यक यंत्रणा अशी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे."

या अभियानाची सुरुवात भिस्तबाग चौकातून करण्यात आली असून, पुढील काही दिवसांत संपूर्ण प्रभागात टप्प्याटप्प्याने हे काम राबविण्यात येणार आहे.

# 'बिनाका गीतमाला' सुरेल महफिलचे आयोजन

**अहमदनगर । आबीद खान**

शहरातील सांस्कृतिक परंपरेला उजाळा देत 'जावेद मास्टर प्रस्तुत बिनाका गीतमाला (भाग १६)' हा सुरेल कार्यक्रम शुक्रवार, ता. १२ डिसेंबर २०२४ रोजी सायं. ६.३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जावेद मास्टर यांनी दिली. नगरकरांसाठी हा संगीतसोहळा अविस्मरणीय ठरणार आहे

कार्यक्रमात जावेद मास्टर, मनोजकुमार, इकबाल बागवान, उसामा शेख, प्रवीण शिंगी, सुनील भंडारी, मोहसीन सैफी, अस्लमकुमार, निलेश गायकवाड, बालाजी गंगावर, प्रशांत छल्लानी, संजय




भिंगारदिवे, विद्या तनवर आणि आरती दिक्षित (पुणे) यांची सादरीकरणे रंगणार आहेत. सूत्रसंचालनाची जबाबदारी शिवकुमार सलुजा (पुणे) सांभाळणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य असे की, लता मंगेशकर, आशा भोसले, मुकेश, मोहम्मद रफी, किशोर कुमार, शब्बीर कुमार, मोहम्मद अजीज आणि सुमन कल्याणपूर यांसारख्या दिग्गज गायकांची अमर गाणी प्रेक्षकांना अनुभवता येणार आहेत. जुन्या सुवर्ण गाण्यांचा हा जल्लोष संगीतप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे.

विनामूल्य प्रवेशिकेसाठी ९९६०३ ७१४९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला डॉ. काशीद हॉस्पिटल आणि साई आदर्श मल्टिस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटीचे सहकार्य लाभले आहे. शहरातील संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल संध्याकाळचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपा महिला मोर्चा जम्बो कार्यकारिणी जाहीर ; जिल्हाध्यक्षपदी प्रिया जानवे

**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहर महिला मोर्चाची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून ही निवड माजी खासदार डॉ. सुजय विखे आणि शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. नवीन कार्यकारिणीत विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या महिलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला.

जिल्हाध्यक्षपदी प्रिया जानवे यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून रेखा मैड, राखी आहेर, शुभांगी देशमुख, कालिंदी केसकर, रोहिणी कोडम आणि वंदना पंडीत यांची निवड झाली.



सरचिटणीस म्हणून संध्या पावसे, सुजाता औटी आणि अर्चना बनकर यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष पदाची जबाबदारी शारदा होशिंग यांच्यावर सोपविण्यात आली असून मीडिया प्रमुखपदी दिपाली जोशी तर मीडिया सहप्रमुखपदी हेमलता कुलकर्णी यांची निवड झाली आहे. चिटणीसपदी मेघा डहाळे, सुवर्णा कुलकर्णी, सविता तागडे, शुभांगी केसकर, कावेरी घोरपडे, माया फसले, संगिता शिंदे, विद्या कुलकर्णी आणि श्वेता कुलकर्णी यांचा समावेश आहे. कार्यकारिणी सदस्यपदी माधवी कुलकर्णी, निलिमा मुळे, रोहिणी पुंडलिक, प्रिया बंब, अंजली आहेर, मालिनी आहेर, प्रतिभा पेंडसे, उषा आहेर, भारती आढाव, संगिता कुलकर्णी, कीर्ती जोशी, वर्षा जोशी, अंजली लोमटे, अनिता हिलगुडे, उषा तरटे, शिवानी जरांगे आणि स्वाती देवरे यांची निवड झाली आहे. पत्रकारपदी अजिता एडके, तर बचत गट प्रमुखपदी मनीषा जगताप यांची नियुक्ती करण्यात आली. अ.जा. विभागात मीरा सरोदे (अध्यक्ष), सुनीता उल्हारे (उपाध्यक्ष) आणि रेखा भोसले (चिटणीस) यांची निवड झाली आहे. जैन प्रकोष्ठ प्रमुखपदी नीता भाळवणकर यांची नियुक्ती करण्यात आली. विशेष निमंत्रित म्हणून सुरेखा विदये, गीता गिल्डा, छाया राजपुत, लिला अग्रवाल, सोनाली चितळे, सोनाबाई शिंदे, आशाबाई कराळे, वंदना ताठे, पल्लवी जाधव, मालन ढोणे, सविता मोरे, पुष्पा बोरूडे, सुप्रिया जाधव आणि रूपाली वारे यांचा समावेश करण्यात आला.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट; तातडीने उपाययोजनांची मागणी

# आव्हाने खुर्द शहापूर परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आव्हाने खुर्द येथील शहापूर रस्त्यालगत असलेल्या भगवान पठाडे यांच्या जनावरांच्या गोठ्याजवळ बुधवार,ता. १० डिसेंबर रोजी ६ च्या सुमारास बिबट्याने दबा धरून हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. योग्य वेळी ही बाब लक्षात आल्याने जीवितहानी टळली.

भगवान पठाडे यांच्या मुलांनी गोठ्याजवळ बिबट्या दबा धरून बसलेला पाहिल्यानंतर त्वरित मोबाइलमधून त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड केला. आवाज होताच बिबट्याला आपली उपस्थिती उघड झाल्याचा भास झाल्याने त्याने तात्काळ पळ काढला. त्यामुळे गोठ्यातील जनावरे तसेच कुटुंबियांचा जीव वाचला. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याचा वावर वाढला असून यापूर्वीही जनावरांवर हल्ल्यांच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून सकाळ संध्याकाळ शेतात जाणे तसेच जनावरांना चारा देणे धोकादायक ठरत आहे. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून ग्रामस्थांनी वन विभागाकडे बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे. वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे मनुष्यहानी होण्याचा धोका वाढला असून विभागाने त्वरित पिंजरे लावणे, गस्त वाढविणे तसेच परिसरात सतर्कता ठेवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ''मुलांना बाहेर पाठवताना घाबरतो, शेतात जाण्याचीही भीती वाटते,'' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

लोकसहभागातून १३०० वर्षांपूर्वीच्या मंदिराचा पुनर्जन्म

# पुरातन महालक्ष्मी मंदिर जिर्णोद्धारास प्रारंभ

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या १३०० वर्षांपूर्वीच्या पुरातन महालक्ष्मी मंदिराच्या जिर्णोद्धार कामाला स्थानिक नागरिकांच्या सहभागातून मोठा वेग आला. अनेक वर्षांपासून अडगळीत व गवतझुडपांनी वेढलेल्या स्थितीत असलेले हे मंदिर आता भक्तांसाठी पुन्हा खुले झाले आहे.



श्रीगोंदा येथील शेख महंमद मंदिरात गेल्या ३८ वर्षांपासून यात्रेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले जाते. पहिल्या सोहळ्यात ह.भ.प. तात्या महाराज महापुरुष यांनी श्रीगोंदा शहरात १३०० वर्षांपूर्वीचे महालक्ष्मी मंदिर असल्याचे सांगितल्याने काही भक्तांचे लक्ष या ठिकाणी वेधले गेले. शोध घेतल्यावर मंदिर गवत, झुडपे आणि कचऱ्याखाली पूर्णपणे झाकलेले असून प्रवेशमार्गही नसल्याचे आढळले.

यानंतर स्थानिक नागरिक पत्रकार दत्ता जगताप, शिवाजी साळुंके, श्रीरंग साळवे व धनेश गुगळे यांनी मंदिर जिर्णोद्धाराचा ध्यास घेत, पुरातत्व विभागाशी सातत्याने पाठपुरावा केला. मंगलप्रभात लोढा यांच्या माध्यमातून पुरातत्व विभागाकडून १० लाख रुपयांचा निधी मिळवण्यात आला. या निधीतून मंदिर परिसरातील गवत-झुडपे हटविणे व तत्कालीन देवरे यांच्या मदतीने मंदिराकडे जाणारा प्रवेशमार्ग मोकळा करण्यात आला. त्यामुळे मंदिर पुन्हा भक्तांसाठी खुले झाले. त्यानंतर श्री महालक्ष्मी सार्वजनिक मंदिर देवस्थान ट्रस्ट स्थापन करून पुरातत्व विभागाकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले. पुरातत्व विभागाने या मंदिराला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले. भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडलेल्या 'नमो तीर्थक्षेत्र' या ७५ देवस्थानांमध्ये श्रीगोंद्याचे महालक्ष्मी मंदिरही समाविष्ट करण्यात आले. पुरातत्व विभागाने ट्रस्टसाठी दोन कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर केला असून, मंदिरालगतची सुमारे ४ गुंठे जागा लोकसहभागातून उपलब्ध करून देण्यात आली. महालक्ष्मी मंदिराचा जिर्णोद्धार वेगाने सुरू असून येत्या काही महिन्यांत १३०० वर्षांपूर्वीचे हे प्राचीन देवस्थान नव्या स्वरूपात भक्तांना दर्शनास उपलब्ध होणार आहे. ट्रस्टने २०१९ पासून केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना आता यश मिळत असून स्थानिकांच्या 'पुरातन मंदिर पुनरुत्थान' या स्वप्नाची पूर्तता होत आहे.

# एआय साक्षरता हीच काळाची गरज– पांडुळे

रयत शिक्षण संस्थेच्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना नवे क्षितिज

**भिंगार । विष्णू उदे**

कृत्रिम बुद्धिमत्ता विषयीची साक्षरता ही बदलत्या युगाची अत्यावश्यक गरज असून विद्यार्थ्यांमध्ये एआयविषयी पुढाकार, आवड आणि संशोधनाची वृत्ती निर्माण करण्यासाठी प्रदर्शनं, प्रशिक्षण, चर्चा व प्रात्यक्षिकांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे कार्यालयीन अधीक्षक राजनारायण पांडुळे यांनी केले.



श्रीमती ॲबर्ट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल, भिंगार येथे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांच्या वाढदिवसानिमित्त एआय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी बोडखे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानदेव पांडुळे उपस्थित होते. प्राचार्य तथा सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, मुख्याध्यापक नारायण अनभुले हे उपस्थित होते.

पांडुळे पुढे म्हणाले, रयत शिक्षण संस्था ही बहुजन विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरली आहे. बदलत्या काळानुसार संस्था सातत्याने नवे उपक्रम राबवत असून वर्गांमध्ये इंटरनेट पॅनल व एआय अभ्यासक्रम हे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब व चेअरमन चंद्रकांत दळवी यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. यावेळी विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. बोडखे म्हणाले, रयत शिक्षण संस्था नेहमी नवे उपक्रम राबवते. कृत्रिम बुद्धिमत्ता हा आजच्या शिक्षणातील सर्वाधिक महत्त्वाचा घटक असून त्याद्वारे रयत शिक्षण संस्थेचे महत्त्व अधिक दृढ झाले आहे.

प्राचार्य तथा सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमुख प्रमोद तोरणे म्हणाले की, एआयचा अभ्यासक्रमात समावेश झाल्याने विद्यार्थ्यांसाठी संधींचे नवीन दालन खुले झाले आहे. एआय विभाग प्रमुख करवते यांनी प्रदर्शनाची माहिती दिली. सूत्रसंचालन संदीप अस्वर यांनी तर आभार मच्छिंद्र नागरगोजे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पद्मासुर कुठला, गणेश मस्के, अरुण सोनवणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जनता विद्यालयास लोढांची ५ लाख देणगी

# लोढांचे दातृत्व समाजाला प्रेरक – जगधने

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

रयत शिक्षण संस्थेला डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या त्यागाची आणि लोकसहभागाची परंपरा लाभली. संस्थेच्या भौतिक आणि गुणात्मक प्रगतीत समाजातील दानशूर व्यक्तींचा मोलाचा वाटा आहे. अशाच दातृत्वातून डी. डी. काचोळे विद्यालयात तीन वर्गखोल्यांचे महत्त्वपूर्ण काम प्रथितयश उद्योजक रमेश लोढा यांनी आपल्या पत्नी स्व. निर्मला रमेश लोढा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पूर्ण केले. समाजहितार्थ केलेले हे दातृत्व प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले. उद्योजक रमेश लोढा यांनी दिलेल्या ५ लाखांच्या सहकार्यातून उभारलेल्या तीन 'पफ पॅनल' वर्गखोल्यांचे उद्घाटन मीनाताई जगधने यांच्या हस्ते झाले. त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी रमेश लोढा होते. प्रमुख अतिथी म्हणून जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम, प्राचार्य प्रवीण बडधे,



प्राचार्य संजय कांबळे, प्राचार्य मुकुंद पोंधे, शशिकांत दहिफळे, सोनाली पैठणे, अनिल चोरडिया, पंकज हिरन, लोकेश लोढा, देवेंद्र पिडीयार आदी उपस्थित होते. प्रस्ताविकामध्ये मुख्याध्यापक सुनील साळवे यांनी रयत संकुल आणि डी. डी. काचोळे विद्यालयात मीनाताई जगधने यांनी केलेल्या विकासकामांची माहिती दिली. यावेळी नेहा महाडदेव आणि तेजस्विनी बेंद्रे यांनी मनोगत व्यक्त केले. लोढा म्हणाले, ''आयुष्यात कमावलेले काहीही सोबत जात नाही. त्यामुळे शक्य तितके दान समाजहितासाठी करावे. विद्यालयातील गोरगरीब विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा बोरावके यांनी केले, तर आभार प्रदर्शन सूर्यकांत सराटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढत

# राष्ट्रवादीचे उमेदवार संजय भागवत यांची माघार

**पाथर्डी । नितीन गटाणी**

नगरपालिकेच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी पाथर्डीत नाट्यमय घडामोड झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) अधिकृत उमेदवार संजय भागवत यांनी बुधवारी अचानक माघार घेतली. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून भाजपाच्या गोटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूर्वी अध्यक्षपदासाठी भाजपाचे अभय आव्हाड, शरद पवार राष्ट्रवादीचे बंडुपाटील बोरुडे आणि राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे संजय भागवत अशी तिरंगी लढत होती. मात्र भागवत यांच्या माघारीनंतर निवडणूक आता दुरंगी होणार आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष रणजीत बेळगे यांनी सांगितले की, ''आम्ही दोन नंबरची पसंती दिलेल्या अधिकृत उमेदवार राहुल विष्णु ढाकणे यांचा अर्ज ग्राह्य धरावा,'' अशी मागणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

मात्र निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते यांनी सांगितले की, ''ढाकणे यांच्या उमेदवारी अर्जाला फक्त एकच सुचक असल्याने अर्ज बाद झाला आहे. पाच सुचक आवश्यक होते.'' या निर्णयावर समाधान न झाल्याने राष्ट्रवादी गटाने न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. भागवत यांच्या माघारीनंतर भाजपाच्या गोटात उत्साहाची लाट पसरली आहे, तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी भागवत यांना काही भाजप कार्यकर्त्यांनी प्रवृत्त केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे.



संजय भागवत यांनी निवेदनात म्हटले आहे, ''पंधरा वर्षांपासून मी पक्षाशी निष्ठा ठेवली. मागणी नसताना पक्षाने मला उमेदवारी दिली, याबद्दल मी कृतज्ञ आहे. मात्र निवडणुकीदरम्यान मला आणि माझ्या सहकाऱ्यांना पक्षाची आवश्यक ती साथ मिळाली नाही. त्यामुळे सहकाऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन मी उमेदवारी मागे घेतली.''

ते पुढे म्हणाले, ''मी कोणत्याही पक्षाला पाठिंबा दिला नाही किंवा कोणाचाही प्रचार करणार नाही. मी एक रुपयाचीही तडजोड केलेली नाही. नगरसेवक म्हणून दोन वेळा निवडून आलो असून एकही रुपयाचा भ्रष्टाचार केलेला नाही. माझ्यावर केलेले आरोप निराधार आहेत, हे जनतेला लवकरच समजेल.''

आता अध्यक्षपदासाठी भाजपाचे अभय आव्हाड आणि शरद पवार राष्ट्रवादीचे बंडु पाटील बोरुडे यांच्यात थेट सामना रंगणार आहे. कोणाला फायदा आणि कोणाला तोटा यावर पाथर्डीत चर्चांना उधाण आले आहे.

# संताजी महाराज पुण्यतिथीनिमित्त गाथा पारायणास प्रारंभ

**नेवासा । विजय खंडागळे**

तिळवण तेली समाजाच्या वतीने संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जगद्गुरु संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याला बुधवारपासून प्रारंभ झाला. सोहळा सोनई येथील भजनी मंडळ मंदिरामध्ये आयोजित करण्यात आला असून ता. १० ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत पार पडणार आहे.

संत तुकाराम महाराज गाथेचे लेखक व राष्ट्रसंत शिरोमणी संताजी महाराज जगनाडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले.



या सोहळ्याच्या निमित्ताने माऊली महिला मंडळ, तेली महिला समाज बांधव संत तुकाराम महाराज गाथा पारायण वाचनासाठी बसले असून माऊली महिला भजनी मंडळ भगिनी गाथा वाचणार आहेत. तसेच तेली समाजतर्फे भजन कार्यक्रम व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सांगता श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या मूर्तीची पूजा, आरती व प्रसादाने होणार आहे. समाजाच्या वतीने बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ऐतिहासिक अहिल्यानगर जिल्ह्याची अधिकृत माहिती आता एका क्लिकवर!

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील शासनाच्या विविध योजना, उपक्रम, सरकारी निर्णय आणि जनहिताच्या माहितीचा अधिकृत व विश्वासार्ह स्त्रोत म्हणून 'जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर' कार्यालयाने नागरिकांसाठी आपले अधिकृत फेसबुक पेज सुरू केले आहे. नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अफवा, चुकीची माहिती किंवा अपूर्ण अपडेट्सपासून वाचवण्यासाठी आणि जिल्हा प्रशासनाच्या सर्व कृती पारदर्शकपणे लोकांपर्यंत




पोहोचाव्यात, यासाठी हे फेसबुक पेज उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील विकासकामे, आपत्कालीन सूचना, महत्त्वपूर्ण सरकारी घोषणा, योजनांचे लाभ, शासकीय उपक्रमांची छायाचित्रे, व्हिडीओ, तसेच जिल्हा प्रशासनाशी संबंधित सर्व ताज्या अपडेट्स वेळोवेळी प्रकाशित करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे.

सोबतच्या कोड स्कॅन करून किंवा येथे दिलेल्या लिंकवर क्लिक करून या अधिकृत फेसबुक पेजला त्वरित फॉलो करावे, जेणेकरून खरी व वस्तुनिष्ठ माहिती थेट जिल्हा प्रशासनाकडून मिळू शकेल. फेसबुक लिंक: https://www. facebook. com/share/ 1AqS5dKu2m/

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### उशिरा निकाल, खर्चात वाढ

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीचे मतदान २ डिसेंबर रोजी पार पडले. त्याच्या दोन दिवस आधी राज्यातील काही ठिकाणचे मतदान पुढे ढकलण्यात आल्याने, ज्या ठिकाणी मतदान झाले त्या ठिकाणची मतमोजणी ३ डिसेंबरलाच होणार की नाही, असा प्रश्न निर्माण झाला. प्रकरण कोर्टात गेले आणि न्यायालयाने मतमोजणी २१ डिसेंबर रोजी घेण्याचा आदेश दिला. मतमोजणी तब्बल १८ दिवस पुढे गेल्याने एकीकडे निकालात उशीर झाला, तर दुसरीकडे प्रशासनाचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला. स्ट्राँगरूममध्ये मतपेट्या सुरक्षित ठेवण्यासाठी बंदोबस्त, पोलिसांची २४ तास तीन शिफ्टमध्ये ड्युटी, मतमोजणीसाठी उभारलेला मंडप १८ दिवस सांभाळण्याची जबाबदारी या सर्वांचा वाढीव बोजा नगरपालिकेवर पडणार आहे. स्थानिक पातळीवर निवडणुकीची संपूर्ण जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांत अधिकारी किरण सावंत-पाटील, तहसीलदार मिलिंद कुमार वाघ आणि नगरपालिका मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी काटेकोरपणे पार पाडली. अतिशय सुबक नियोजन करून कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची सर्वांनी दक्षता घेतली. मतदानाच्या दिवशी ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सुविधा पुरवण्यात आल्या. प्रशासनाने मतदान अधिकाऱ्यांसाठी अगोदरच गाद्या उपलब्ध केल्या. वीज, पाणी आणि आवश्यक सर्व सुविधा प्रत्येक मतदान केंद्रावर पुरवण्यात आल्या. बंदोबस्तासाठी आलेल्या बाह्य जिल्ह्यातील पोलिसांपासून ते जवानांपर्यंत सर्वांची योग्य सोय प्रशासनाने केली. कर्मचारीही माणसे आहेत, हे भान ठेवून चांगले नियोजन करण्यात आल्याने मतदानाची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक झाली. मात्र मतमोजणी पुढे ढकलल्यामुळे प्रशासनावर मोठा ताण आला आहे. मतपेट्या आणि यंत्रे ठेवलेल्या स्थळी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. उमेदवारांच्या प्रतिनिधींना बसण्याची व आवश्यक असल्यास विश्रांतीची सोयही त्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशासनाचा एकच उद्देश नगरपालिका निवडणूक पारदर्शक आणि चांगल्या वातावरणात व्हावी. तथापि, मतमोजणी लांबल्याने उशिरा निकाल आणि वाढलेला खर्च या दोन्ही गोष्टी प्रकर्षाने जाणवत आहेत.

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार

**ट्रॅजेडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले.** तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ. मसानी यांना समजले तेव्हा डॉ. मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली.

वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल – ए – आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले.

देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली.

त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला.

या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान – ए – इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. **दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनयातील भीष्माचार्य, अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!**

# एकल महिलांचा विषय विधिमंडळ पटलावर

## साऊ समितीच्या प्रयत्नांना यश

**नागपूर । सलीमखान पठाण**

महाराष्ट्रातील एकल महिलांचा प्रश्न साऊ एकल महिला समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंगळवारी राज्य विधिमंडळाच्या पटलावर चर्चेला आला. समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे आणि राज्यभरातील समन्वयकांनी गेल्या तीन वर्षांत विविध स्तरावर या विषयावर ठाम भूमिका मांडली होती.

कोविड काळात कुटुंबातील कर्त्या पुरुषांचे मोठ्या प्रमाणावर निधन झाल्याने अनेक महिलांवर एकल माता बनण्याची वेळ आली. परित्यक्ता, विधवा, प्रौढ कुमारिका, घटस्फोटित अशा विविध प्रकारच्या एकल महिलांचे प्रश्न अधिकाधिक गंभीर बनले. या महिलांच्या पुनर्वसनासाठी महिला व बालविकास विभागाने २७ ऑगस्ट २०२१ रोजी तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समित्यांची स्थापना केली. मात्र या समित्यांचे कामकाज मर्यादित व थंडावलेले असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले.

गठित समित्यांची कार्यकक्षा केवळ 'कोरोना एकल महिलां'पुरती मर्यादित असल्याने, सर्वच प्रकारच्या एकल महिलांना या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी कार्यक्षेत्र वाढविण्याची मागणी साऊ एकल महिला समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, तसेच महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली होती.

या मागणीची दखल घेत विधान परिषद सदस्य सचिन अहिर, निरंजन डावखरे, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, उमा खापरे, सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके आणि सुनील शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान या विषयावर तारांकित प्रश्न उपस्थित केला.

या प्रश्नाला उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे की, ''मिशन वात्सल्य योजना कधीच बंद केली नव्हती. राज्यातील विविध सामाजिक संस्थांकडून सर्व प्रकारच्या एकल महिलांसाठी ही योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार २९ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली असून, आता सर्व प्रकारच्या एकल महिलांसाठी तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समित्यांचे कार्यक्षेत्र वाढविण्यात आले आहे. २१ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या विविध विभागांच्या २५ योजनांचा लाभ देण्यासाठी या समित्या सक्रियपणे काम करतील.''

> राज्य सरकारने साऊ एकल महिला समितीच्या पाठपुराव्याची दखल घेऊन मिशन वात्सल्य योजनेची व्याप्ती वाढविली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या एकल महिलांना सरकारी योजनांचा लाभ व मदतीचा हात मिळणार आहे.
> – **मिलिंदकुमार साळवे**, राज्य समन्वयक, साऊ एकल महिला समिती

# सैनिक कल्याण विभागात लिपिक टंकलेखक पदभरती

**अहमदनगर । रयत समाचार**

सैनिक कल्याण विभाग तसेच विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक टंकलेखक (गट–क) या सरळसेवेतील एकूण ७२ पदांकरिता अर्ज मागविण्यात आले आहेत. ही भरती महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या अशा माजी सैनिकांच्या कुटुंबातील एकाच व्यक्तीस उपलब्ध आहे. ज्यांचा युद्धकाळात किंवा शांतताकाळात सैनिकी सेवेत मृत्यू झाला, किंवा अपंगत्व येऊन सेवेसाठी अयोग्य ठरले आहेत. त्यानंतरच्या पसंती क्रमाने पात्र उमेदवारांकडून अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री २३:५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार असून, इतर कोणत्याही माध्यमातील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**'महाबिझ २०२६' : उद्योगपती, व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

# 'इंडिया प्रॉपर्टी शो' एनआरआय उद्योजकांसोबत विशेष संवाद

**दुबई । राम कोंडीलकर**



भारत, जीसीसी, मेना आणि आफ्रिका देशांतील उद्योजकांना एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या, संयुक्त अरब अमिरातीस्थित जीएमबीएफ ग्लोबल या स्वयंसेवी व्यावसायिक मंचाने दुबईतील परदेशी एनआरआय उद्योजक, उद्योगपती आणि व्यावसायिकांसोबत विशेष संवाद सत्र आयोजित केले. या सत्रात जीएमबीएफ ग्लोबलचे अध्यक्ष डॉ. सुनील व्ही. मांजरेकर यांनी व्यापार, उत्पादन, स्थावर मालमत्ता, तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रांमध्ये भारतीय उद्योगांसाठी संयुक्त अरब अमिरातीमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या संधींचा आढावा घेतला.

'इंडिया प्रॉपर्टी शो' दरम्यान घेण्यात आलेल्या या चर्चासत्रात जीएमबीएफ ग्लोबलच्या नेतृत्वाचे मार्गदर्शन, महाबिझ कार्यक्रमाच्या प्रचार मोहिमेला मिळालेला जागतिक प्रतिसाद आणि येत्या ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुबईत होणाऱ्या महाबिझ २०२६ या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेबद्दलची वाढती उत्सुकता मांडण्यात आली. कार्यक्रमातील अनेक बांधकाम व्यावसायिक आणि प्रदर्शनकर्त्यांनी परिषदेत प्रतिनिधी किंवा प्रायोजक म्हणून सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

सत्रात सल्लागार मंडळाच्या सदस्यांनी विविध देशांतील प्रचार कार्यक्रमांचे निष्कर्ष सादर केले.

डॉ. साहित्य चतुर्वेदी यांनी लंडन (युके) येथील उपक्रमातील प्रतिसाद मांडताना तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या आणि सल्लागार संयुक्त अरब अमिरातीमध्ये व्यवसाय विस्तार करण्यास उत्सुक असल्याचे सांगितले. कॅ. संजय गगरानी यांनी सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथील बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे मांडले. ऑस्ट्रेलियन उद्योगांकडून संयुक्त उपक्रम, बाजार विस्तार आणि भागीदारीबाबत वाढती आवड दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. आर.जे. रोनक कोठेचा यांनी टाइम्स ऑफ दुबईसोबत होणाऱ्या आगामी माध्यमसहकार्याची माहिती दिली. यामुळे महाबिझ २०२६ चा प्रचार संयुक्त अरब अमिरातीतील प्रभावी व्यावसायिक व जीवनशैली समुदायापर्यंत पोहोचणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी याकूब अल अली यांनी जीएमबीएफ ग्लोबलच्या उपक्रमांचे कौतुक केले व संयुक्त अरब अमिरातीभारत व्यवसाय संबंध अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

महाबिझ २०२६ : जागतिक व्यावसायिकांना एकत्र आणणारा प्रभावी उपक्रम. १५ पेक्षा जास्त देशांतील ८०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. व्यवसायतेव्यवसाय भेटी, संयुक्त गुंतवणूक उपक्रम, निर्यातविक्री करार, व्यावसायिक भागीदारी आणि ज्ञानदेवाणघेवाण अशा विविध अंगांचा समावेश परिषदेत असेल. परिषदेची मुख्य संकल्पना ''संपर्क ते करार'' उद्योजकांना प्रत्यक्ष आणि फलदायी व्यावसायिक संधींशी जोडण्याचे ध्येय व्यक्त करते.

जीएमबीएफ ग्लोबल (गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम) ही दुबईस्थित स्वयंसेवी संस्था असून संयुक्त अरब अमिराती, जीसीसी, भारत, आफ्रिका आणि अन्य देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक व भागीदारी मजबूत करण्यावर कार्यरत आहे. मागील दहा वर्षांत या मंचाने सहकार्य, प्रगती आणि जागतिक विस्तारावर आधारित भक्कम व्यावसायिक समुदाय उभा केला आहे.

सत्राच्या शेवटी डॉ. सुनील व्ही. मांजरेकर यांनी सर्व उपस्थितांना जीएमबीएफ ग्लोबलचे सदस्य होण्याचे आवाहन केले, जेणेकरून दोन दिवस चालणाऱ्या महा २०२६ या जागतिक व्यावसायिक मेळाव्यात सहभागी होता येईल.

# कष्टकरी आंदोलनाचे प्रेरणास्थान डॉ. बाबा आढावांना भावपूर्ण अभिवादन

अहमदनगर । रयत समाचार



कष्टकरी कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे सत्यशोधक विचारांचे प्रवर्तक निसर्गवासी डॉ. बाबा आढाव यांना हमाल भवन, मार्केटयार्ड येथे आयोजित अभिवादन सभेत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. शहरातील विविध कामगार संघटनांचे नेते, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच शेकडो कामगार भावंडांच्या उपस्थितीत सभेत हळवे वातावरण निर्माण झाले.

अभिवादन सभेचे आयोजन तातडीने करण्यात आले असून, हमाल पंचायत अहिल्यानगरचे नेते अविनाशतात्या घुले आणि डॉ. प्रशांत शिंदे यांनी समन्वय साधत पुढाकार घेतला.

सभेचे प्रमुख वक्ते प्रा. सुभाष वारे यांनी डॉ. आढाव यांच्या कार्याची आठवण करून देताना सांगितले की, बाबांच्या सत्यशोधक विचारांनी कष्टकरी वर्गाला उभारी दिली. अंगमेहनती कामगारांच्या घामाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी रक्ताचे अश्रू गाळले. त्यांचे कार्य हे प्रेरणेचा दीप आहे.

कामगारनेते, समाजकार्यकर्ते आणि उपस्थितांनी एकमुखाने ठामपणे व्यक्त केले की, बाबा, तुम्हारे सपनों को मंझिल तक ले जायेंगे! ही भावना कार्यांजली म्हणून सर्वांकडून व्यक्त झाली.

सभेत डॉ. आढाव यांच्या तत्त्वनिष्ठ संघर्षाची, संघटन उभारणीची आणि देशभरात उभ्या केलेल्या कष्टकरी चळवळीची उजळणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याचा संकल्प पुनः अधोरेखित केला.

# आयसीईए सारख्या नामवंत संस्थांसोबत काम करण्यास शासन उत्सुक– गायकवाड

**नवी दिल्ली । रयत समाचार**

महाराष्ट्र सदनाचे गुंतवणूक निवास आयुक्त सुशील गायकवाड यांची भारत सेल्युलर आणि इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशनचे कार्यकारी संचालक व मुख्य सल्लागार राजेश शर्मा यांनी महाराष्ट्र सदनात भेट घेतली. या बैठकीत महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक्स, सेल्युलर तसेच सेमीकंडक्टर उद्योगांच्या विस्तारासाठी संभाव्य सहकार्य, गुंतवणूक संधी आणि धोरणात्मक बाबींवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत राजेश शर्मा यांनी आयसीईएच्या भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील प्रगती आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच महाराष्ट्रात सेमीकंडक्टर आणि मोबाइल उत्पादन क्लस्टर विकसित करण्यासाठी राज्य सरकारबरोबर भागीदारीच्या शक्यतेवर भर दिला. सुशील गायकवाड यांनी महाराष्ट्राच्या नव्या गुंतवणूक धोरणाची वैशिष्ट्ये, उद्योगपूरक वातावरण आणि केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांची माहिती दिली. महाराष्ट्र राज्यात गुंतवणूकदारांसाठी सुलभ वातावरण निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नरत आहे.



तुकाराम ढिकले
७५८८८२८८३४

# तपोवन

**विश्ववार्ता**

सिंहस्थाच्या नावे झाडांची कत्तल
पहा ही अक्कल कलियुगी १

ऐकले का कुणी साधुंना वावडे
त्यांना का झाडे नको झाली २

साधुंना आवडे उलट निवांत
मिळतो एकांत झाडांसंगे ३

साधुंचा निवास असे जंगलात
तप करतात हिमालयी ४

तपोवन आहे फुफ्फुसे येथली
आरोग्याची किल्ली शहराची ५

वृक्ष खरे मित्र अनमोल धन
जाणा त्यांचे ऋण आधी सारे ६

वृक्ष फुले देती वृक्ष फळे देती
सावलीही देती सर्वांसाठी ७

तेच देती अन्न तेच देती श्वास
भरविती घास आपणाशी ८

झाडांचे ते किती सांगू उपकार
प्रेमाची पाखर तेच देती ९

वृक्षवल्ली आम्हा आहेत सोयरे
संतांचे बोल रे ध्यानी धरा १०

साऱ्यांनीच तुम्ही तपोवनी यावे
हसावे खेळावे झाडाखाली ११

सिंहस्थात सुध्दा साधुंनीही यावे
हसावे बसावे सावलीत १२

झाडे ही साऱ्यांची संपत्ती जनांची
सोयरे आमुची आहे खरी १३

झाडांना ऐकवा गीता भागवत
तेची खरे संत तपोवनी १४

झाडेच देतात शीतल गारवा
मनाला विसावा तीच देती १५

पुढील पिढ्यांना हवा शुद्ध द्याया
झाडे वाढवू या मनोभावे १६

नका विसरु सारे कोरोनाचे दिस
भयाण राक्षस आठवा तो १७

म्हणून साऱ्यांना करीतो प्रार्थना
ठेवा प्रेमपान्हा झाडांसाठी १८

झाडे ही लेकरे तेच आई–बाप
व्यर्थ जपतप त्यांच्याविण १९

तेच देती सारे शेती माती पाणी
आधार जीवनी प्राणी जना २०

पशु पक्षी प्राणी व्यर्थ झाडाविण
अशक्य जीवन जगताचे २१

# श्रीगोंदा सोसायटी चेअरमनपदी सुनील बोरुडे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



श्रीगोंदा विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी मर्यादित, श्रीगोंदा येथे पदाधिकाऱ्यांच्या निवडीची सभा मंगळवार, ता. ९ डिसेंबर २०२५ रोजी सहाय्यक निबंधक (सहसंस्था), श्रीगोंदा नारायण परजणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.चेअरमन पदासाठी सुनील शिवराम बोरुडे यांच्या नावाची सुचना मोहन हरिभाऊ डांगरे यांनी मांडली, तर ज्योती हेमंत खेतमाळीस यांनी अनुमोदन दिले.

उपाध्यक्ष पदासाठी हनुमंत धोंडीबा उदमले यांच्या नावाची सुचना सखाराम दशरथ औटी यांनी केली, तर अनिल जगन्नाथ नन्नवरे यांनी अनुमोदन दिले. चेअरमन व उपाध्यक्ष पदासाठी एकमेव नावे सुचवली गेल्याने, सुनील बोरुडे यांची चेअरमनपदी तर हनुमंत उदमले यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा सहाय्यक निबंधक नारायण परजणे यांनी केली.

निवड प्रक्रियेदरम्यान सहाय्यक निबंधक कार्यालयातील निलेश मुंढे तसेच सोसायटीचे सचिव राजू यांनी सहकार्य केले. संपूर्ण निवड प्रक्रिया सहाय्यक निबंधक परजणे यांनी सुरळीतरीत्या पार पाडली.या प्रसंगी संस्थेचे संचालक अशोक आळेकर, बापुराव सिदनकर, सुभाष बोरुडे, राजू गोरे, पोपट कोथिंबीरे, मंदाकिनी वडवकर, संस्थेचे माजी चेअरमन पोपट बोरुडे, जगन्नाथ औटी, कालिदास खेतमाळीस, सुर्यकांत वडवकर तसेच सभासद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.